# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १९१) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंगळवार, दि.२८ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## नीट परीक्षेत कमी गुण मिळाल्याने अंकिताने जीवन संपवले

अहिल्यानगर दि.२७ (प्रतिनिधी)- अहिल्यानगरच्या कर्जत तालुक्यातील जलालपूर येथे नीट परीक्षेतील अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्याच्या नैराश्यातून एका विद्यार्थिनीने स्वतःचे जीवन संपवल्याची दुर्दैवी घटना घडली. अंकिता सांगळे असं गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या विद्यार्थिनीचे नाव आहे. अंकिताला नीट परीक्षेत १६६ गुण मिळाले होते. अंकिताच्या आत्महत्येमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

अंकिताने हे टोकाचे पाऊल उचलले तेव्हा तिचे वडील पंढरपूरला गेले होते. त्यांना ही घटना समजाच त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. डोळ्यात डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहात अंकिताने ज्या खोलीत अभ्यास केला, मेहनत घेतली त्याच खोलीत तिने आपली जीवनयात्रा संपवली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करत पुढील तपास सुरू केला. या घटनेमुळे गावात शोककळा पसरली असून नातेवाईक आणि नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, स्पर्धा परीक्षामुळे विद्यार्थ्यांवर मानसिक ताण येतोय तो कमी करण्यासाठी पालक, शिक्षक आणि समाजाने संवेदनशीलपणे साथ देण्याची गरज या घटनेने पुन्हा अधोरेखित केली आहे.

## आंदोलनातील पोलिसांच्या अत्याचाराचे समर्थन करता येणार नाही, लाठीमाराची चौकशी झाली पाहिजे-सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली दि.२७ (प्रतिनिधी)- नीट पेपरफुटी प्रकरणात कॉकरोच जनता पार्टीने जंतर-मंतरवर केलेल्या ऐतिहासिक आंदोलनानंतर आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. असं असलं तरी आंदोलनादरम्यान विद्यार्थी आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जच्या मुद्द्यावरून देशाचं राजकारण तापलं आहे. एकीकडे जंतर मंतर येथील सीजेपीच्या आंदोलनादरम्यानच्या हिंसाचारवर विरोधकांनी सरकारला जाब विचारला असताना दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयाने देखील या बाबत महत्वाचं निरीक्षण नोंदवलं आहे. आंदोलनातील पोलिसांच्या अत्याचाराचे समर्थन करता येणार नाही, लाठीमाराची चौकशी झाली पाहिजे, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे आधी धर्मेंद्र प्रधानांचा राजीनाम्याने काहीसे अडचणीत आलेल्या सरकारसह दिल्ली पोलिसांनाही हिशेब द्यावा लागणार असल्याची चर्चा आहे.



दिल्ली पोलीस आणि आंदोलक दोघांनी केलेल्या मर्यादाभंगाची निष्पक्ष चौकशी आवश्यक असल्याचे मत सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. सोबतच प्रत्येक नागरिकाचा शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करण्याचा हक्क संविधानाने संरक्षित आहे आणि त्याचे रक्षण झालेच पाहिजे असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवलं आहे. पेपरफुटीविरोधात देशभरात सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनांवर सुप्रीम कोर्टानी टिप्पणी करताना पुढे सांगितलं की, पोलीस आणि आंदोलक या दोघांनी केलेल्या अत्याचारांची निष्पक्षपणे चौकशी झाली पाहिजे. सरन्यायधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने ही टिप्पणी दिली आहे. केवळ आंदोलन होत आहे म्हणून शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार नाकारला जाऊ शकत नाही असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

दरम्यान, पोलिसांच्या अत्याचारांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि आंदोलने हाताळण्यासाठी एकसमान राष्ट्रीय नियमावलीची मागणी केलीय. केवळ आंदोलन होते आहे म्हणून पोलिसांच्या अत्याचारांचे समर्थन करता येणार नाही असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. या संदर्भातील सर्व याचिका उद्या एकत्र सूचीबद्ध केल्या जाव्यात, असे निर्देश कोर्टाने दिले आहेत. तर आंदोलन म्हणजे लाठीचार्ज नव्हे आणि आंदोलन म्हणजे हिंसाचारही नव्हे. या विषयावर संपूर्ण देशासाठी एकसमान मार्गदर्शक तत्त्वांची आवश्यकता आहे. याचिकाकर्त्यांनी किंवा सरकारनी परस्परविरोधी भूमिका घेऊ नये अशी टिप्पणी कोर्टाने सुनावणी वेळी केली आहे.

## मुंबईत विद्यार्थी संघटना ९ ऑगस्टला भव्य रॅली काढणार

### देशभरातील विद्यार्थ्यांना एकत्र येण्याचे आवाहन

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- नीट पेपरफुटी प्रकरणात विद्यार्थ्यांच्या तीव्र आंदोलनानंतर अखेर सरकारला माघार घ्यावी लागली आणि धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या शिक्षणमंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. दिल्लीत झालेल्या या घडामोडींनंतर महाराष्ट्राच्या राजकारणातही हालचालींना वेग आला आहे. असे असताना एकीकडे दिल्लीच्या जंतर मंतरवरील सीजेपी आणि विद्यार्थ्यांचं आंदोलन संपलं असलं तरी मुंबईत पुन्हा एकदा विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी नऊ ऑगस्टला विविध विद्यार्थी संघटना रॅली काढणार असल्याची माहिती आहे. नीट परीक्षा पद्धतीत पारदर्शकता, महाराष्ट्रातील टीईटी पेपर फुटी प्रकरण, एमपीएससी विद्यार्थ्यांचे प्रश्न, मराठी शाळांचे प्रश्न, अशा अनेक विद्यार्थ्यांच्या समस्या घेऊन एकत्रित आंदोलनाची चळवळ सुरू ठेवणार असल्याची माहिती आहे.

दरम्यान, देशभरात विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी सुरू केलेलं आंदोलन आता मुंबईमध्ये सुरूच राहणार असल्याचे चित्र आहे. मुंबईतील विविध विद्यार्थी संघटना एकत्र येत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी ही चळवळ सुरू ठेवणार असल्याचा निर्णय विविध विद्यार्थी संघटनांनी घेतला आहे. प्रश्न मांडण्यासाठी राजकीय पक्ष नाही तर विद्यार्थी एकत्र येऊन सुद्धा लढत दिला जाऊ शकतो, असा विश्वास विद्यार्थ्यांमध्ये आल्याचं संघटनांचे म्हणणं आहे. त्यामुळे विद्यार्थी प्रश्नांसाठी विविध विद्यार्थ्यांना एकत्र येण्याचं आवाहन करत विद्यार्थी संघटनांची ही चळवळ सुरू राहणार आहे.

दरम्यान, क्रांती दिनाच्या दिवशी म्हणजेच ९ ऑगस्टला पुन्हा एकदा राज्यातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नाबाबत वाचा फोडण्यासाठी विद्यार्थी संघटना एकत्र येऊन आंदोलन करणार आहेत. यात कॉक्रोच जनता पार्टी, छात्र भारती, एआयएसएफ, एसएफआय अशा विविध विद्यार्थी संघटना एकत्र येऊन ही चळवळ सुरू ठेवणार असल्याची माहिती विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींनी दिली आहे.

## लोकसभेत परीक्षा सुधारणा विधेयक सादर; गोंधळामुळे सदन ४ वेळा स्थगित

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- सोमवारी लोकसभेत सार्वजनिक परीक्षा सुधारणा विधेयक सादर करण्यात आले. मात्र, विरोधी पक्षांच्या गदारोळामुळे चर्चा थांबली. विरोधी पक्षांनी विद्यार्थी मारहाणीच्या मुद्द्यावर चर्चेचा आग्रह धरला.

या गदारोळामुळे दिवसभरात लोकसभेचे कामकाज चार वेळा तहकूब करण्यात आले. जेव्हा जेव्हा कामकाज पुन्हा सुरू झाले, तेव्हा काँग्रेस आणि समाजवादी पक्षाचे खासदार बॅनर घेऊन सभागृहाच्या मध्यभागी (वेलमध्ये) प्रवेश करून घोषणाबाजी सुरू करत होते.

अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले की, विधेयकावर चर्चा करण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या खासदारांनी एकमताने निर्णय घ्यावा. यानंतर बिरला यांनी काँग्रेसचे खासदार के. सी. वेणुगोपाल आणि समाजवादी पक्षाचे खासदार अखिलेश यादव यांची भेट घेतली.

सकाळी ११ वाजता केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी पेपरफुटीशी संबंधित सार्वजनिक परीक्षा सुधारणा विधेयक सभागृहात सादर केले.

## बिहार बंद आंदोलनात विद्यार्थ्यांवर एसपीच्या बॉडीगार्डचा थेट एके-४७ मधून गोळीबार

### प्रकरण सुप्रीम कोर्टात; राहुल गांधींचा सरकारवर घणाघात

नवी दिल्ली दि.२७ (वृत्तसंस्था)- बिहारमध्ये विद्यार्थी आंदोलनात थेट एके-४७ ने गोळीबार करणाऱ्या एसपी पुरण झा यांचा अंगरक्षक अभिषेक पटेलला निलंबित करण्यात आले आहे. हे प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आहे. आरजेडीचे राज्यसभा खासदार मनोज झा यांनी जनहित याचिका दाखल केली आहे. या प्रकरणावर उद्या (२८ जुलै) सुनावणी होणार आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या मुद्द्यावरून सरकारवर निशाणा साधत लिहिले, 'संपूर्ण व्यवस्थाच घातक आहे.' दरम्यान, सीजेपीचे प्रवक्ते सौरभ दास आणि आशुतोष रांका यांनी विद्यार्थ्यांवरील कारवाई सहन केली जाणार नाही, असे म्हटले आहे.

विद्यार्थी संघटनांच्या बिहार बंद आणि आंदोलनादरम्यान सिवानमध्ये तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. आंदोलनादरम्यान, एसपी पुरण झा यांच्या अंगरक्षकाने जमावाच्या दिशेने एके-४७ ने गोळीबार केला, ज्याचा व्हिडिओ समोर आला. व्हिडिओ समोर येताच, पोलिसांच्या कृतीवर आणि बळाच्या वापरावर प्रश्नचिन्हे उपस्थित केले गेले. प्रकरण चिघळल्यानंतर, पोलीस मुख्यालयाने संपूर्ण घटनेचा अहवाल मागवला. प्राथमिक तपासात व्हिडिओची पुष्टी झाल्यानंतर, संबंधित अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करण्याचे आदेश जारी करण्यात आले. या प्रकरणी विभागीय चौकशीही सुरू करण्यात आली आहे. तपास अहवालाच्या आधारे पुढील कारवाई केली जाईल.

२५ जुलै रोजी पोलीस आणि आंदोलकांमध्ये जोरदार दगडफेक आणि लाठीचार्ज झाला. काही आंदोलक गांधी मैदानातील मंचावर चढून तेथून पोलिसांवर दगडफेक करू लागले, असा आरोप आहे. यानंतर, पोलिसांनी आंदोलकांना पांगवण्यासाठी आधी अश्रुधुराच्या नळकांड्या फेकल्या आणि नंतर लाठीचार्ज केला. पोलिसांच्या कारवाईनंतर, आंदोलकांनी गांधी मैदान सोडले आणि शहराच्या विविध भागांमध्ये पांगले. दगडफेकीत एसपी पुरण झा यांच्या हाताला दुखापत झाली.

सिवानमधील गोळीबारात तीन विद्यार्थी जखमी झाले. दोघांच्या मानेला गोळी चाटून गेली, तर एका विद्यार्थ्याच्या मांडीत गोळी अडकली आहे. मानेत गोळी लागल्याने गंभीर अवस्थेत असलेल्या एका विद्यार्थ्याला शनिवारी पाटणा येथे हलवण्यात आले. इतर दोन विद्यार्थ्यांना नंतर पाटणा येथे दाखल करण्यात आले.

राहुल गांधींनी या संपूर्ण मुद्द्यावरून केंद्र सरकार आणि पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला आहे. त्यांनी एका सोशल मीडिया पोस्टद्वारे प्रश्न उपस्थित केले. त्यांनी लिहिले, 'संपूर्ण व्यवस्था विद्यार्थ्यांच्या विरोधात घातक आहे. बिहारमध्ये आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर (पान ४ वर)

## डॉक्टरांना मारहाण प्रकरणी नगरसेवक रमेश म्हात्रेला उच्च न्यायालयाकडून जामीन देण्यास दिला नकार

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- शिवसेना शिंदे गटाचे नगरसेवक रमेश म्हात्रे यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी डोंबिवलीच्या शासकीय रुग्णालयात डॉक्टरला मारहाण केल्याची घटना घडली होती. या प्रकरणी नगरसेवक रमेश म्हात्रे आणि इतर आरोपींना अटक करण्यात आली होती. या सर्वांना न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी रमेश म्हात्रेसह इतर सर्व आरोपींना ३ ऑगस्टपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, जामीन मिळवण्यासाठी रमेश म्हात्रेचे प्रयत्न सुरु आहेत. वादाच्या भोवऱ्यात सापडलेले शिंदे गटाचे नगरसेवक रमेश म्हात्रेला तत्काळ जमीन देण्यास उच्च न्यायालयाने पुन्हा नकार दिला आहे. रमेश म्हात्रेला शुक्रवारपर्यंत जामीन मिळणार नसल्याची माहिती मिळाली आहे.

या प्रकरणाचा तपास पोलीस उपायुक्त (डीसीपी) दर्जाच्या अधिकाऱ्याकडे सोपवण्याचे आदेश देखील मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. आधी डॉक्टरांना मारहाण करायची आणि मग प्रकृतीच्या कारणास्तव जामीन मागण्याच्या रमेश म्हात्रेच्या भूमिकेवर उच्च न्यायालयाकडून नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. तुम्ही मतदारांकडे जाता आम्हाला तुमची सेवा करायची आहे, म्हणून मत मागता आणि निवडून आल्यावर मारहाण करता असे म्हणत मुंबई उच्च न्यायालयाने रमेश म्हात्रेला कानपिचक्या दिल्या आहेत. लोक तुम्हाला मते देऊन निवडून आणतात आणि निवडून आल्यावर फाईल आणि खुर्च्यांनी त्यांची डोकी फोडता, निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीने असं वागायचं का? असा सवाल देखील मुंबई उच्च न्यायालयाने नगरसेवक रमेश म्हात्रेला केला आहे.

मारहाण करताना रमेश म्हात्रे अर्ध्या सेकंदाचाही वेळ दवडत नव्हते, ते सतत मारहाण करत राहिले जेणेकरून वेळ अजिबात वाया जाणार नाही अशी टिप्पणी उच्च न्यायालयानं केली आहे. रमेश म्हात्रे ७३ वर्षीय वाटत नाही, तुम्ही त्यांचे मारहाणीचे व्हिडिओ बघितले का? मुंबई उच्च न्यायालयाच्या हंगामी सरन्यायाधीश रवींद्र भाऊ यांची रमेश म्हात्रेंच्या वकिलांना विचारणा केली. ते टेबलवरुन जवळ जवळ उड्यामारून डॉक्टरला मारहाण करत होते असे उच्च न्यायालयाने म्हटलं आहे. दरम्यान, या प्रकरणी शुक्रवार पर्यंत सुनावणी तहकूब करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

## सीजेपी विद्यार्थी आंदोलकांना कायदेशीर आणि वैद्यकीय मदत करणार

### कपिल सिब्बल यांच्याकडून कायदेशीर लढ्याला १ कोटींचा निधी

नवी दिल्ली दि.२७ (वृत्तसंस्था)- कॉकरोच जनता पार्टीचे प्रवक्ते सौरभ दास आणि राज्यसभा खासदार कपिल सिब्बल यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केलं. सौरभ दास यांनी कपिल सिब्बल यांच्या संपर्कात होतो, त्यांच्याकडून कायदेशीर सल्ला मागितला होता, असं सांगितलं. कपिल सिब्बल यांनी सीजेपी आणि विद्यार्थी आंदोलकांवरील कायदेशीर लढ्यासाठी एक कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणा केली. सीजेपीकडून सौरभ दास यांनी कपिल सिब्बल यांचे आभार मानले. बिहार, आसाम, पश्चिम बंगालमध्ये आंदोलकांवर पोलिसांकडून कारवाई सुरु असल्याची माहिती सीजेपीच्या लीगल टीमकडून देण्यात आली.

सौरभ दास म्हणाले की, आंदोलनादरम्यान काही लोकांनी जनहित याचिका दाखल केली होती, त्यातील काही राजकीय हेतून प्रेरित होत्या. आमची भूमिका होती की आमची चळवळ दुसऱ्या मार्गावर जाऊ नये. आम्ही कपिल सिब्बल यांच्या संपर्कात होतो. आम्ही २५ जुलै रोजी आंदोलन समाप्त करत असल्याचं जाहीर केलं होतं. आंदोलनाचं वातावरण कमी झाल्यानंतर हे सरकार वैयक्तिक पातळीवर लोकांना लक्ष्य करणं सुरु करेल, अशी शक्यता वाटत होती. कारण इतर चांगल्या आणि मोठ्या आंदोलनांमध्ये लोकांना खोट्या प्रकरणांमध्ये अडकवण्यात आलं. सीजेपी सर्व विद्यार्थ्यांसाठी कायदेशीर आणि वैद्यकीय मदत देशभर करत आहे. आम्ही याच मुद्यांवर कपिल सिब्बल यांच्याकडून कायदेशीर सल्ला मागितला होता, अशी माहिती दास यांनी दिली.

कपिल सिब्बल म्हणाले की आम्हाला जी भीती वाटतेय ती विद्यार्थ्यांबाबत वाटतेय. जे उपोषणाला बसले, ज्यांनी शांततापूर्ण आंदोलन केलं त्यांच्यावर कारवाई करु नये अशी आमची इच्छा आहे. हे ऑरगॅनिक आंदोलन होतं. हेच सरकार नव्हे सरकारं कोणत्याही प्रकारे मतभेदाचा आवाज उठू नये. जे.पी. नड्डा यांनी काही आश्वासनं दिली असतील. विद्यार्थी माझ्याकडे आल्यानंतर मी त्यांना मदत करेन असं सांगितलं. बिहार, आसाम, बंगाल, महाराष्ट्रात जिथं शांततापूर्ण आंदोलनं झाली आहेत, जिथं जिथं विद्यार्थी आंदोलकांना टार्गेट करत असेल तर आपण व्यवस्था करावी, तिथं आमचे वकिल उभे राहावेत, असं कपिल सिब्बल म्हणाले.

विद्यार्थ्यांवर कारवाई करु नये, जर एफआयआर केली असेल तर ती मागं घ्यावी. सीजेपी एक रचना तयार करेल, कुठं काय झालं? कोणत्या विद्यार्थ्यावर कारवाई झालं, तिथं कोणता वकील असेल जो मदत करेल, वकील कुठं राहतात, किंवा ते कशा प्रकारची मदत करु शकतात याबाबत माहिती वकील भरतील, अशी माहिती सिब्बल यांनी दिली. कपिल सिब्बल यांनी स्वत: एक कोटी रुपये देण्याची घोषणा केली. वकिलांनी यामध्ये मदत करावी, जिथं जिथं कायद्याचा दुरुपयोग होईल तिथं आपले वकील उभे राहतील, अशी सुरुवात करत आहोत. मी एक कोटी रुपये देत आहे ते आंदोलाकांच्या संरक्षणासाठी आणि ज्यांच्यावर कारवाई झाली त्यांच्यासाठी या रकमेचा वापर होईल, असं कपिल सिब्बल म्हणाले. आंदोलकांच्या कायदेशीर लढाईसाठी जो खर्च होईल, त्या निर्णयात माझा सहभाग नसेल, असंही कपिल सिब्बल यांनी म्हटलं.

## १० आणि २० रुपयांच्या प्लास्टिक नोटा येणार

नवी दिल्ली दि.२७ (वृत्तसंस्था)- भारतात लवकरच १० आणि २० रुपयांच्या प्लस्टिक (पॉलिमर) च्या नोटा पाहायला मिळू शकतात. केंद्र सरकारनं रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या पॉलिमर नोटांच्या पायलट प्रोजेक्टला मंजुरी दिली आहे. ज्यानुसार १० आणि २० रुपयांच्या १००-१०० कोटी पॉलिमर नोटा चाचणीसाठी जारी केल्या जातील. ही चाचणी यशस्वी ठरल्यास पॉलिमर नोटा मोठ्या प्रमाणात जारी करण्यासंदर्भात निर्णय घेतला जाऊ शकतो.

केंद्रीय वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी लोकसभेत लेखी उत्तरात यासंदर्भात माहिती दिली. आरबीआयच्या पॉलिमर नोटांच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली आहे. आता फक्त हा एक पायलट प्रोजेक्ट आहे. भारतातील हवामान आणि परिस्थितीत प्लास्टिक नोटा किती टिकाऊ आणि उपयुक्त ठरतात हे पाहिलं जाणार आहे.

## सरकार कुठलंही असो त्यांना जनतेचे ऐकावे लागते, महात्मा गांधींनी दाखवलेला मार्ग आजही यश देतो-सोनम वांगचुक

नवी दिल्ली दि.२७ (वृत्तसंस्था)- सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी उपोषण सोडल्यानंतर त्यांच्यावर मेदांता रुग्णालयात उपचार सुरु होते. आज त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. डिस्चार्जनंतर सोनम वांगचुक यांनी महात्मा गांधींची समाधी असलेल्या राजघाटला भेट दिली. महात्मा गांधी यांनी दाखवलेला सत्याग्रहाचा मार्ग हा आजही संदर्भहीन झालेला नाही. त्यांच्या मार्गावर चाललं तर यश मिळतंच हे पुन्हा एकदा दिसलं आहे असं सोनम वांगचुक म्हणाले आहेत. एवढंच नाही तर सोनम वांगचुक यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला जे यश मिळालं त्याबाबत समाधान व्यक्त केलं आहे. सोनम वांगचुक आणि त्यांची पत्नी गीतांजली या दोघांनीही राजघाट येथे जाऊन महात्मा गांधींच्या स्मृतीस्थळाला अभिवादन केलं. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधला.

सगळ्या माध्यमांचे मी आभार मानतो, त्यांना धन्यवाद देतो. २६ दिवसांच्या उपोषणानंतर मी उपोषण मागे घेतलं. त्यानंतर आंदोलनही आता संपलं आहे. यानंतर महात्मा गांधी यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी राजघाटावर आलो होतो. त्यांनी दाखवलेला मार्ग १०० वर्षांपूर्वी जेवढा उपयुक्त होता तेवढाच आताही ठरतो आहे. लोक म्हणतात की अशा पद्धतीच्या सरकारमध्ये अशा शासकासमोर अशी आंदोलनं चालत नाहीत. पण कुठलंही सरकार असो त्यांना जनतेचं ऐकावंच लागतं. याआधी महात्मा गांधींनी दाखवलेला उपोषणाचा, शांतता पूर्ण आंदोलनाचा मार्ग आम्ही लडाखमध्ये अनुभवला आहे. आता देशपातळीवरही मी हा अनुभव घेतला आहे, असं सोनम वांगचुक म्हणाले आहेत.

सोनम वांगचुक म्हणाले की मी देशातल्या तरुणांचं, जनतेचं आणि शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या प्रत्येकाचे आभार मानतो आहे. जो काही तोडगा निघाला तो चर्चेतूनच निघाला आहे. कुठल्याही प्रकारच्या लाठी चार्जने काहीही घडलं नाही. आम्ही शांततेचं आवाहन केलं होतं. तसंच आम्हाला जो काही त्रास झाला तो आम्ही सहन केला. विद्यार्थ्यांचं आंदोलन यशस्वी झालं याचं मनस्वी समाधान आहे असं सोनम वांगचुक यांनी म्हटलं आहे.

## तुकाराम मुंढेंच्या धडक कारवाईला न्यायालयाचा मोठा झटका, 'त्या' दूध डेअरींवरील कारवाईला स्थगिती

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- राज्यभरात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली दूध भेसळीविरोधात धडक मोहीम सुरू आहे. मात्र, या धडक कारवायांवर आता मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने गंभीर प्रश्न उपस्थित करत एफडीएला मोठा झटका दिला आहे. तपासणीनंतर नियमानुसार सुधारणेसाठी १४ दिवसांची मुदत न देता थेट परवाने निलंबित केल्याचा आरोप करत दाखल झालेल्या याचिकांवर सुनावणी करताना न्यायालयाने ८ दूध डेअरींवरील कारवाईला अंतरिम स्थगिती दिली आहे.

छत्रपती संभाजीनगर, जालना, जळगाव आणि अहिल्यानगरमधील डेअरींना हा दिलासा मिळाल्याने एफडीएच्या कायदेशीर प्रक्रियेवरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दररोज हजारो लिटर दूध संकलन करणाऱ्या या डेअरींशी जोडलेले हजारो शेतकरीही या निर्णयाकडे आशेने पाहत आहेत.

एफडीएच्या नियमांनुसार आणि आयुक्तांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, दूध डेअरीच्या तपासणीत त्रुटी आढळल्यास त्या दूर करण्यासाठी संबंधित व्यावसायिकाला १४ दिवसांची मुदत देणे बंधनकारक आहे. मात्र, ही मुदत न देताच परवाने निलंबित करणे बेकायदा असल्याचा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी केला. तसेच डेअरी चालकांनी अनेक त्रुटी आधीच दूर केल्याचे न्यायालयात स्पष्ट केले. प्राथमिक सुनावणीनंतर न्यायालयाने या निलंबनाच्या कारवाईला स्थगिती दिली.

## 'ई २०' इंधन वाद : नितीन गडकरी यांची मागणी उच्च न्यायालयाकडून मान्य

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- 'ई-२०' इंधन वादावरून 'डीपफेक' आणि कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) मजकुराबाबत मेटा व गुगलविरोधात बदनामीचा दावा दाखल करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. याप्रकरणी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी परवानगी दिली. गडकरी यांच्या याचिकेत, अज्ञात व्यक्तींनी बदनामीकारक' मजकूर प्रसारित केला असून त्यात 'ई २०' इंधन कार्यक्रमासाठी त्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार असल्याचे, चुकीच्या पद्धतीने दर्शवले गेल्याचा दावा केला आहे.

गडकरी यांनी 'लेटर्स पेटंट'च्या कलम १२ अन्वये परवानगीसाठी ही याचिका दाखल केली होती. दाव्याचे कारण उच्च न्यायालयाच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्राबाहेरही उद्भवते, त्यामुळे ही प्रक्रियात्मक तरतूद वापरली जाते. अधिकार क्षेत्राच्या मर्यादा असूनही न्यायालयाला मूळ दिवाणी अधिकारक्षेत्रांतर्गत दावा चालवता यावा, यासाठी अशी परवानगी आवश्यक असते. न्यायमूर्ती अभय अहुजा यांच्यासमोर गडकरी यांची याचिका सोमवारी सुनावणीसाठी आली, यावेळी गडकरी यांच्यावतीने दिवाणी दावा दाखल करण्यासाठी परवानगी मागण्यात आली.

प्रतिवादींनी कथित बदनामीकारक आणि 'डीपफेक' मजकूर सार्वजनिकरित्या उपलब्ध करून दिला असून त्यात मुंबईतील वापरकर्त्यांचाही समावेश आहे. हा मजकूर मुंबई उच्च न्यायालयाच्या प्रादेशिक हद्दीत पाहण्यायोग्य आणि पाहण्याच्या उद्देशाने उपलब्ध असल्याने, दाव्याचे कारण मोठ्या प्रमाणात मुंबईत उद्भवते, असा युक्तिवाद गडकरी यांच्यातर्फे करण्यात आला. तसेच, यामुळे उच्च न्यायालयाला हा दावा ऐकण्याचा आणि त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार प्राप्त होतो, असे असेही गडकरी यांच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले.

हा मजकूर मुंबईबाहेरही इंटरनेटवर उपलब्ध आहे, त्यामुळे दाव्याचे काही कारण न्यायालयाच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्राबाहेरही उद्भवते; म्हणूनच कलम १२ अन्वये परवानगी घेणे आवश्यक ठरले, असे देखील गडकरी यांच्यावतीने न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न करण्यात आला. गडकरी यांच्यावतीने करण्यात आलेला संक्षिप्त युक्तिवाद ऐकल्यानंतर, न्यायमूर्ती आहुजा यांनी त्यांना दिवाणी दावा दाखल करण्याची परवानगी दिली.

## राज्यातील अनेक भागात पावसाचा जोर, विदर्भातील ५ जिल्ह्यात यलो अलर्ट

### उत्तर अन् पश्चिम महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता, हवामान खात्याचा अंदाज

मुंबई दि.२७ (प्रतिनिधी)- राज्यात गेल्या काही दिवसांपासून सातत्याने हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस हजेरी लावत आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील पावसाची ही स्थिती अशीच कायम राहण्याची शक्यता आहे. आजपासून २७ जुलै २०२६ रोजी राज्यातील अनेक भागांत पावसाचा जोर वाढणार असून काही जिल्ह्यांना यलो अलर्ट तर घाटमाथा व किनारपट्टीच्या भागांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

विदर्भातील भंडारा, अमरावती, गोंदिया, नागपूर, वर्धा आणि यवतमाळ या सहा जिल्ह्यांमध्ये पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला असून येथे मुसळधार पावसाची शक्यता आहे. दुसरीकडे अकोला, बुलढाणा आणि वाशिम या जिल्ह्यांसाठी हवामान विभागाकडून कोणताही विशेष अलर्ट वर्तवण्यात आलेला नाही. तर मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली, नांदेड आणि लातूर या जिल्ह्यांमध्ये सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याचा अंदाज असून या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. तसेच धाराशिव, बीड आणि परभणी जिल्ह्यांत काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

उत्तर महाराष्ट्रात विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज आहे. धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. जळगाव जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो, त्यामुळे येथे यलो अलर्ट देण्यात आला आहे. नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांत तसेच नाशिक घाटमाथा परिसरात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. तर पश्चिम महाराष्ट्रातील पुणे आणि सातारा जिल्ह्यांच्या घाटमाथा परिसरात (पान ४ वर)

# लोकशाहीच्या दारात विद्यार्थ्यांचा आक्रोश, आता उत्तर कोण देणार?

## राहुल गांधींचे अमित शाह यांना पत्र : दिल्लीतील आंदोलन, कथित पोलिसी बळाचा वापर आणि लोकशाहीच्या उत्तरदायित्वाचा गंभीर सवाल

लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका नव्हेत. लोकशाही म्हणजे प्रश्न विचारण्याचा अधिकार, असहमती व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आणि सत्ताधाऱ्यांना जाब विचारण्याची मुभा. देशातील तरुणाई जेव्हा आपल्या भविष्याशी संबंधित प्रश्न घेऊन रस्त्यावर उतरते, तेव्हा त्या आवाजाकडे सरकारने शत्रू म्हणून नव्हे, तर देशाच्या भवितव्याचा इशारा म्हणून पाहिले पाहिजे. मात्र दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या कथित पोलिसी कारवाईच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना लिहिलेले पत्र अनेक गंभीर प्रश्न उपस्थित करते. हे प्रश्न केवळ राहुल गांधी किंवा विरोधकांचे नाहीत तर ते देशातील प्रत्येक पालकाचे, प्रत्येक विद्यार्थ्याचे आणि लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे आहेत.

२५ जुलै २०२६ रोजी लिहिलेल्या या पत्रात राहुल गांधी यांनी २० जुलै रोजी दिल्लीमध्ये शांततेने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित बळाच्या वापराबाबत उत्तरदायित्व निश्चित करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या पत्रानुसार, विद्यार्थी न्याय्य आणि उत्तरदायी शिक्षणव्यवस्थेची मागणी करीत होते. त्यांना ऐकून घेण्याऐवजी सुरक्षा यंत्रणांकडून अश्रुधूर आणि इतर बळाचा वापर करण्यात आला, अनेक विद्यार्थी जखमी झाले आणि महिला विद्यार्थिनींशीही गैरवर्तन झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. सर्वांत गंभीर आरोप म्हणजे पॅलेट गनच्या वापराबाबतचा. १९ वर्षीय विद्यार्थी साहिल लोचब याला पॅलेट लागल्याने त्याची दृष्टी गमावण्याची शक्यता असल्याचा उल्लेखही पत्रात करण्यात आला आहे. या आरोपांची सत्यता, घटनाक्रम आणि जबाबदारी यांची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. कारण आरोप गंभीर असतील तर त्यांची चौकशीही तितकीच गंभीर असली पाहिजे. सत्ताधाऱ्यांनी आरोप नाकारण्यापूर्वी सत्य समोर आणले पाहिजे आणि विरोधकांनी आरोप करताना तथ्यांची जबाबदारी घेतली पाहिजे. लोकशाहीत कोणत्याही पक्षाला सत्यापेक्षा मोठे स्थान नाही.

राहुल गांधी यांनी गृहमंत्र्यांना दोन थेट प्रश्न विचारले आहेत. विद्यार्थ्यांविरुद्ध पॅलेट गनसह घातक बळाचा वापर करण्यास गृहमंत्र्यांनी मंजुरी दिली होती का? नसेल, तर त्यास जबाबदार कोण? तसेच साध्या वेशातील व्यक्ती विद्यार्थ्यांना लाठीने मारताना दिसत असतील, तर त्या पोलिस कर्मचारी होत्या की स्वयंसेवक? त्यांच्या तैनातीला परवानगी कोणी दिली? हे प्रश्न केवळ राजकीय आरोप म्हणून बाजूला सारणे योग्य ठरणार नाही. कारण जर शांततापूर्ण आंदोलनावर खरोखरच अनावश्यक किंवा अतिरेकी बळाचा वापर झाला असेल, तर त्याची जबाबदारी निश्चित करणे ही सरकारचीच नैतिक आणि घटनात्मक जबाबदारी आहे आणि जर आरोप चुकीचे असतील, तर सरकारनेही स्वतंत्र चौकशीच्या माध्यमातून सत्य देशासमोर ठेवले पाहिजे. सत्याला चौकशीची भीती नसते.

आज देशातील विद्यार्थ्यांच्या मनात अस्वस्थता आहे. परीक्षा, प्रवेशप्रक्रिया, स्पर्धात्मक परीक्षांमधील पारदर्शकता, पेपरफुटी, रोजगाराच्या संधी आणि शिक्षणाचा वाढता खर्च हे प्रश्न केवळ विद्यार्थ्यांचे नाहीत. हे देशाच्या सामाजिक आणि आर्थिक भवितव्याशी जोडलेले प्रश्न आहेत. एका गरीब कुटुंबातील मुलगा वर्षानुवर्षे अभ्यास करतो. आई-वडील आपल्या कुवतीपलीकडे जाऊन त्याच्या शिक्षणासाठी पैसा खर्च करतात. त्या मुलाला जेव्हा परीक्षा व्यवस्थेवरच विश्वास राहात नाही, तेव्हा त्याच्या हातात उरते तरी काय? त्याचा आवाज रस्त्यावर येतो. त्या आवाजाला उत्तर देण्याऐवजी जर त्याच्यावर लाठी उगारली गेली, तर प्रश्न सुटत नाही, उलट तो अधिक तीव्र होतो. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाकडे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहणे सोपे आहे, पण त्यामागील असंतोष समजून घेणे ही खरी राजकीय परिपक्वता आहे. आंदोलनकर्त्यांशी संवाद साधणे, त्यांच्या मागण्या ऐकून घेणे आणि योग्य मागण्यांवर तातडीने निर्णय घेणे हा लोकशाहीचा मार्ग आहे. संवादाचे दरवाजे बंद झाले की रस्ते संघर्षाचे मैदान बनतात.

महात्मा गांधींच्या देशात सत्याग्रहाची परंपरा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून नागरिकांना स्वातंत्र्य, समता आणि न्यायाचा अधिकार दिला. संविधानाने नागरिकाला प्रश्न विचारण्याचा अधिकार दिला आहे. म्हणूनच सरकारवर टीका करणारा विद्यार्थी देशद्रोही ठरत नाही आणि प्रश्न विचारणारा नागरिक शत्रू ठरत नाही. उलट सत्तेला प्रश्न विचारले जातात म्हणूनच लोकशाही जिवंत राहते. परंतु येथे एक महत्त्वाचा मुद्दा आहे. आंदोलनाचा अधिकार हा लोकशाहीचा अविभाज्य भाग असला तरी आंदोलन शांततापूर्ण असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, हिंसा किंवा कायदा हातात घेण्याचे समर्थन कोणत्याही परिस्थितीत करता येणार नाही. मात्र शांततापूर्ण आंदोलन आणि हिंसक जमाव यांच्यात फरक करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. काही व्यक्तींच्या कृत्यामुळे संपूर्ण आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना गुन्हेगार समजणे ही लोकशाहीची पद्धत नाही.

राहुल गांधींच्या पत्रातील सर्वांत महत्त्वाचा संदेश हाच आहे की, 'उत्तरदायित्व कोणाचे? गृहमंत्रालय देशाच्या अंतर्गत सुरक्षेचे सर्वोच्च राजकीय केंद्र आहे. त्यामुळे राजधानी दिल्लीतील कायदा-सुव्यवस्थेबाबत प्रश्न उपस्थित झाले तर त्यांची उत्तरे देण्याची राजकीय जबाबदारी सरकारची असते. पोलिसांनी कोणत्या परिस्थितीत कोणता निर्णय घेतला, बळाचा वापर का केला, पॅलेट गन वापरण्याचा निर्णय कोणी घेतला, साध्या वेशातील व्यक्ती कोण होत्या ई. या सर्व प्रश्नांची पारदर्शक चौकशी झाली पाहिजे. लोकशाहीत सरकारची ताकद विरोधकांना गप्प करण्यात नसते, तर विरोधकांच्या प्रश्नांना उत्तर देण्यात असते. आजचा विद्यार्थी उद्याचा मतदार आहे. आज ज्या तरुणाच्या हातात पुस्तक आहे, त्याच्याच हातात उद्या देशाची दिशा ठरवणारे मतदानाचे बटन असेल. त्याच्या मनात जर व्यवस्थेविषयी अविश्वास निर्माण झाला, तर ती केवळ सरकारची नव्हे, तर संपूर्ण लोकशाही व्यवस्थेची हानी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील अस्वस्थता समजून घेणे ही कोणत्याही सरकारची प्राथमिक जबाबदारी असली पाहिजे.

राहुल गांधी यांनी पत्राच्या शेवटी शांततापूर्ण आंदोलन हे कोणत्याही लोकशाहीसाठी अत्यावश्यक असल्याचे म्हटले आहे. सरकारची जबाबदारी आंदोलनकर्त्यांचे संरक्षण करणे आणि संवादातून त्यांच्या तक्रारी सोडवणे ही आहे, असा त्यांचा मुद्दा आहे. हा विचार पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन पाहण्याची गरज आहे. आज प्रश्न राहुल गांधी विरुद्ध अमित शाह असा नाही. प्रश्न आहे की, विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा आणि लोकशाहीच्या भवितव्याचा! जर विद्यार्थ्यांवर अन्याय झाला असेल तर दोषींवर कारवाई झाली पाहिजे. जर पोलिसांनी नियमबाह्य बळाचा वापर केला असेल तर त्याची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. जर आरोपांमध्ये तथ्य नसेल तर सरकारने निष्पक्ष चौकशीद्वारे ते स्पष्ट केले पाहिजे. पण सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांना शत्रू समजण्याची मानसिकता संपली पाहिजे. कारण हातात दगड घेऊन उभा असलेला प्रत्येक तरुण गुन्हेगार असेलच असे नाही, कदाचित त्याच्या हातात आधी पुस्तक होते आणि व्यवस्थेने त्याचा आवाज ऐकला नाही म्हणून तो रस्त्यावर आला असेल. त्याच्या डोळ्यात अश्रू असतील, पण त्यामागे कदाचित आपल्या देशाच्या भवितव्याची चिंता असेल.

एखाद्या विद्यार्थ्याच्या डोळ्याला पॅलेट लागल्याचा आरोप हा केवळ एका व्यक्तीच्या जखमेचा प्रश्न नाही. तो संपूर्ण व्यवस्थेच्या संवेदनशीलतेची परीक्षा आहे. त्या डोळ्यातून रक्त आले असेल तर त्या रक्ताचा रंग राजकीय नसतो. तो लालच असतो आणि तो प्रत्येक संवेदनशील भारतीयाच्या अंतःकरणाला प्रश्न विचारतो. विद्यार्थ्यांना लाठी नको, उत्तर हवे आहे. आंदोलनाला दडपशाही नको, संवाद हवा आहे. प्रश्नांना गुन्हा ठरवणे नको, समाधान हवे आहे आणि लोकशाहीला भीती नको, उत्तरदायित्व हवे आहे. राहुल गांधींच्या पत्राने उपस्थित केलेले प्रश्न त्यामुळे केवळ संसद भवनाच्या भिंतीत अडकून राहता कामा नयेत. त्यांची उत्तरे देशाला मिळाली पाहिजेत. निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. दोषी कोणत्याही पदावर असो, त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे आणि जर प्रशासन निर्दोष असेल, तर तेही सत्य पुराव्यांसह जनतेसमोर आले पाहिजे. कारण लोकशाहीचा खरा कस निवडणुकीच्या दिवशी लागत नाही, तो लागतो जेव्हा सत्ता आणि नागरिक आमनेसामने उभे राहतात. त्या क्षणी सत्ता जर संवाद निवडते, तर लोकशाही मजबूत होते. सत्ता जर दडपशाही निवडते, तर लोकशाही कमकुवत होते.

आज देशातील तरुणाई सरकारकडे पाहत आहे. त्यांच्या डोळ्यांत प्रश्न आहेत, त्यांच्या हातात भविष्य आहे आणि त्यांच्या ओठांवर एकच मागणी आहे ङ्गआम्हाला गप्प करू नका, आमचे ऐका!ङ्घ या आवाजाला उत्तर देणे ही केवळ सरकारची राजकीय जबाबदारी नाही; तर भारतीय लोकशाहीची प्रतिष्ठा जपण्याची राष्ट्रीय जबाबदारी आहे. कारण विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत दिसणारे अश्रू हे केवळ त्यांच्या वेदनेचे प्रतीक नसतात, ते देशाच्या भवितव्याबद्दलच्या त्यांच्या चिंतेचे प्रतिबिंब असतात. लोकशाहीत प्रश्न विचारणारा विद्यार्थी शत्रू नसतो, तो देशाचा भावी नागरिक असतो. त्याच्या हातातील पुस्तक हिसकावून त्याच्या हातात लाठी देण्याची वेळ येऊ नये, एवढीच अपेक्षा. कारण लाठीने आवाज काही काळ दाबता येतो, पण प्रश्न संपवता येत नाहीत. प्रश्नांची उत्तरे द्यावीच लागतात.

आज गरज आहे ती दडपशाहीची नव्हे, संवादाची-संघर्षाची नव्हे, संवेदनशीलतेची आणि आरोप-प्रत्यारोपांची नव्हे, तर पारदर्शक उत्तरदायित्वाची. कारण लोकशाहीचा खरा कस निवडणुकीच्या दिवशी लागत नाही तो लागतो तेव्हा, जेव्हा सत्तेच्या दारात उभा असलेला एक विद्यार्थी थरथरत्या आवाजात विचारतो ङ्गमाझ्या भवितव्याचे काय?ङ्घ त्या प्रश्नाचे उत्तर जर सत्तेने संवादातून दिले, तर लोकशाही जिंकेल आणि जर त्या प्रश्नाला दडपशाहीने उत्तर दिले, तर जखम फक्त विद्यार्थ्याच्या डोळ्याला होणार नाही, ती लोकशाहीच्या अंतरात्म्यावर होईल.

**- प्रवीण बागडे**

# चवीच्या मोहात आरोग्याचा विसर

आजकाल घराबाहेर पडले, की प्रत्येक चौकात खाद्यपदार्थांचा वास जिभेला भुरळ पाडतो. मग ते तळलेले वडापाव, चटकदार पाणीपुरी, रंगीबेरंगी ज्यूस, आकर्षक मिठाया, चमचमीत बिर्याणी, मसालेदार चायनीज असो की गरमागरम समोसे... चव जिभेवर रेंगाळते आणि आपण क्षणाचाही विचार न करता ते पदार्थ खायला जातो. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या फूड व्हिडीओंनी तर या सवयीला अधिक खतपाणी घातले आहे. पण या चमचमीत पदार्थांच्या मागे लपलेले वास्तव मात्र अंगावर काटा आणणारे आहे. आज महाराष्ट्रात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेल्या धडक कारवायांमुळे हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. राज्यभरात बनावट तूप, कृत्रिम पनीर, भेसळयुक्त मसाले, निकृष्ट तेल, कालबाह्य अन्नपदार्थ, दूषित मिठाई आणि दूध यावर सातत्याने धाडी टाकल्या जात आहेत. अनेक कारखाने सील करण्यात आले, परवाने रद्द झाले, गुन्हे दाखल झाले. या कारवायांनी एक गोष्ट स्पष्ट केली, आपल्या ताटापर्यंत पोहोचणाऱ्या अन्नाचा प्रवास जितका मोठा, तितकाच त्यात भेसळीचा धोका अधिक.

याच पार्श्वभूमीवर अभिनेता श्रेयस तळपडे यांची 'द इंडिया स्टोरी' या चित्रपटाच्या निमित्ताने दिलेली मुलाखत अत्यंत बोलकी आहे. त्यांनी या मुलाखतीत एक प्रश्न विचारला, तुमच्या थाळीतील अन्न खरोखरच सुरक्षित आहे का? हा प्रश्न केवळ चित्रपटाचा प्रचार नाही, तर समाजाला जागे करणारा इशारा आहे. श्रेयस तळपदे सांगतो की, या चित्रपटाची पटकथा वाचल्यानंतर थोडा धक्काच बसला. अन्नभेसळीमुळे लोकांचे जीव जाऊ शकतात, कर्करोगासारखे गंभीर आजार होऊ शकतात, हे समजल्यावर त्यांनी हा चित्रपट करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी स्पष्टपणे म्हटले की, आज घरचे अन्न खा, असे आपण म्हणतो; पण घरात येणारे तांदूळ, डाळी, तेल, दूध आणि मसालेच भेसळयुक्त असतील, तर घरचे अन्नही किती सुरक्षित आहे? हा प्रश्न प्रत्येक कुटुंबाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. श्रेयस तळपदे यांनी आणखी एक मुद्दा मांडला तो म्हणजे, आज ऑर्गॅनिक किंवा सेंद्रिय अन्नाच्या नावाखाली महागडी उत्पादने विकली जात आहेत. पण ती सामान्य माणसाच्या आवाक्यात आहेत का? जर सुरक्षित अन्न खाण्यासाठी जास्त पैसे मोजावे लागत असतील, तर गरीब आणि मध्यमवर्गीयांनी काय करावे? सुरक्षित अन्न हा श्रीमंतांचा विशेषाधिकार नसून प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे. आज परिस्थिती अशी आहे की, बाजारात मिळणाऱ्या प्रत्येक वस्तूकडे संशयाने पाहावे लागते. दूध भेसळयुक्त तर नाही ना? तूप शुद्ध आहे का? मिठाईतील रंग आरोग्यास अपायकारक तर नाहीत? फळे कृत्रिमरीत्या पिकवली आहेत का? भाज्यांवर धोकादायक रसायनांचा मारा झाला आहे का? या प्रश्नांची उत्तरे सामान्य ग्राहकाकडे नसतात. अलीकडे आपल्या वाचनात अन्नभेसळ केलेल्या अनेक बातम्या समोर येत आहेत. प्रसिद्ध हॉटेलांमधील अन्नात अळ्या किंवा पाली आढळणे, ताकात माशी, मिठायांमध्ये किडे दिसणे, फ्रीजमध्ये कुजलेले मांस सापडणे, भाजीपाला डबक्यात धुणे, रस्त्यावरील खाद्यपदार्थांसाठी अत्यंत अस्वच्छ पाण्याचा वापर होत असल्याचे उघड झाले. यामध्ये केवळ विक्रेत्यांची चूक नाही. तर ग्राहक म्हणून आपणही अनेकदा निष्काळजीपणा करतो. स्वस्तात मिळते, चविष्ट वाटते म्हणून किंवा सोशल मीडियावर प्रसिद्ध आहे म्हणून आपण कोणत्याही ठिकाणी खायला जातो. स्वच्छता, परवाना, अन्नाचा दर्जा, वापरलेले तेल, साठवणूक याचा विचार फार कमी लोक करतात.

दरम्यान, उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल यांनी केलेले एक विधानही विचार करायला लावणारे आहे. त्यांनी काही वसतिगृहांच्या पाहणीत विद्यार्थी जेवणासोबत ड्रग्ज आणि मद्यही मागवत असल्याचा दावा केला. या विधानावर राजकीय वाद झाला; परंतु त्या विधानामागील मूळ संदेश वेगळा आहे. आजच्या तरुणांच्या खाण्याच्या सवयी झपाट्याने बदलत आहेत. पोषक आहारापेक्षा फास्टफफूड, प्रक्रिया केलेले पदार्थ, ऊर्जा पेये आणि व्यसनांकडे झुकणारी जीवनशैली वाढत आहे. त्यातच भेसळयुक्त अन्नाची भर पडली, तर पुढील पिढीच्या आरोग्याचे चित्र किती भयावह असेल, याची कल्पनाही करवत नाही. अन्नभेसळ ही केवळ ग्राहकांची फसवणूक नाही; तर नफा कमावण्यासाठी एखादा व्यापारी हजारो लोकांच्या आरोग्याशी खेळत असेल, तर त्याला केवळ दंड करून चालणार नाही. तुकाराम मुंढे यांच्यासारखे अधिकारी कारवाई करत आहेत, ही निश्चितच समाधानाची बाब आहे; पण ही मोहीम एखाद्या अधिकाऱ्यावर अवलंबून राहता कामा नये. ती संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी बनली पाहिजे. यासाठी सरकारने प्रत्येक जिल्ह्यात आधुनिक अन्न तपासणी प्रयोगशाळा उभारणे, नियमित तपासण्या करणे, दोषींवर कारवाई करणे आणि ग्राहकांना तक्रार नोंदविण्याची सुलभ व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर शाळा, महाविद्यालये आणि समाजमध्यमांतून सुरक्षित अन्नाविषयी जनजागृतीही तितकीच महत्त्वाची आहे; परंतु शेवटी एक प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारायला हवा, आपण आपल्या मुलांच्या हातात नेमके काय देत आहोत? त्यांच्या डब्यात पोषण आहे की रसायने? त्यांच्या आवडत्या चिप्समध्ये चव आहे की आरोग्याचा ऱ्हास? आपण बाहेरून आणलेला प्रत्येक घास त्यांच्या भविष्यातील आजारांचे कारण ठरत नाही तर ना? आज गरज आहे ती केवळ भेसळखोरांविरोधात कारवाईची नाही, तर चवीपेक्षा आरोग्याची निवड करणाऱ्या समाजाची. कारण आपल्या ताटातील प्रत्येक घास सुरक्षित असेल, तरच आपल्या कुटुंबाचे, समाजाचे आणि देशाचे भविष्य निरोगी राहील.

## स्मार्ट मीटरबाबत पंढरपूर वारीमध्ये जनजागृती




छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) - स्मार्ट मीटरबाबत वीज ग्राहकांच्या मनातील शंका, गैरसमज दूर करून त्याचे फायदे थेट सांगण्यासाठी महावितरणच्या महावितरण वाळूज शहर उपविभागातर्फे शनिवारी (२५ जुलै) पंढरपूरच्या आषाढी एकादशी वारीमध्ये जनजागृती करण्यात आली.

यावेळी नागरिकांना ग्राहकांना काळानुरूप वीजमीटरच्या तंत्रज्ञानात होत गेलेल्या बदलांची माहिती देण्यात आली. स्मार्ट मीटर हे अत्यंत अचूक असून, ग्राहकांचा प्रत्यक्ष वीजवापर जेवढा आहे, तेवढीच नोंद यामध्ये केली जाते. त्यामुळे बिलिंगच्या तक्रारी कमी झाल्याचे यावेळी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. महावितरणचे ॲप डाऊनलोड करून देऊ दैनंदिन वीज वापराची माहिती दाखविण्यात आली. स्मार्ट मीटर हे स्वयंचलित पद्धतीने रीडिंग घेते, त्यामुळे मानवी हस्तक्षेप टळतो आणि अचूक बिल मिळते. ज्या ग्राहकांना वीजबील वाढीव असल्याची शंका असल्यास त्यांनी आपल्या घरातील अर्थिंग तपासून घ्यावी, तसेच विद्युत सुरक्षेसाठी आरसीसीबी (रेसिड्यूअल करंट सर्किट ब्रेकर) बसवून घेण्यासंदर्भात सुद्धा आवाहन करण्यात आले. नागरिकांनी स्मार्ट मीटरबाबत पसरणाऱ्या कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता या तंत्रज्ञानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना स्मार्ट मीटरच्या उपयुक्ततेची माहिती देऊन शंकांचे निरसन केले. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. पंढरपूरची वारी ही जिल्ह्यातील सर्वात मोठी वारी आहे. त्यामुळे महावितरणच्या या उपक्रमास नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहायक अभियंता रवी मिरगणे, विक्रांत खाडे, कनिष्ठ अभियंता विशाखा रणवरे व इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## कारगिल युद्धातील शहिदांना वैजापूरात जेष्ठ नगरिकांची भावपुर्ण आदरांजली /शहिदांजली



वैजापूर, दि. २७ (प्रतिनिधी) - २६ जुलै, १९९९ साली कारगिल युद्धात शहीद झालेल्या जवानांना येथील आधार जेष्ठ नागरिकांनी सेवा संघाच्या वतीने भारत मातेची प्रतिमा समोर ठेऊन शनिवार (ता. २६) रोजी भावपुर्ण आदरांजली/शहिदांजली अर्पण केली. संघाजी सर्व साधारण सभा होती. या सभेच्या अध्यक्षस्थानी उत्तमराव साळुंके होते तर प्रमुख अतिथी प्रा.पी. जी. श्रीवास्तव, जेष्ठ नागरिक रवींद्र आप्पा साखरे, जेष्ठ नागरिक अण्णासाहेब शेळके, ज्ञानेश्वर शेळके यांची उपस्थिती होती. जेष्ठ नागरिक तथा सेवा निवृत्त शिक्षणांधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांनी कारगिल युद्धातिल शहीद जवानांच्या शौर्य, कर्तृत्व व राष्ट्रनिष्ठेच्या कर्तव्याची माहीती विशद केली. नंतर सर्व जेष्ठ नागरिक उभे राहिले व मौन धारण करून या वीरांना आदरांजली समर्पित केली. या वेळी ऍड धरम सिंह राजपूत व ज्ञानदेव शेळके यांचेही समयोचित भाषण झाले. या नंतर ज्या जेष्ठ नागरिकांचे वाढदिवस होते त्यांच्या जन्म दिन बाबत शाल व गुलाब पुष्प देऊन त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले.

सूत्र संचलन धोंडीराम सिंह राजपूत यांनी केले तर आभार सोन्याबापू गावडे यांनी मानले. उत्तमराव साळुंके यांनी प्रास्ताविक करून ,अहवाल सादर करून आभार मानले. या समयी १००जेष्ठ नगरिक उपस्थित होते. जेष्ठ नागरिक पोपट धुपाजी भोसले, रंजक शंकरराव शेटे, अंकुश मगर, सी.के.पवार, वसंतराव साळुंके, बबन क्षीरसागर, सेवानिवृत्त तलाठी तथा महाराष्ट्र नारायणी सेनेचे अध्यक्ष अशोक पवार खंडाळकर, बी.बी.थोरात, साहेबराव साळुंके, एस. डी. त्रिभुवन, कृष्णाराव कांबळे, शरद मोहरील, मुकुंद दाभाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# कैलासनगर स्मशानभूमीच्या पुनर्विकासाचे भूमिपूजन; वर्षभरात साकार होणार आधुनिक 'वैकुंठ धाम'

छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) - शहरातील ऐतिहासिक कैलासनगर स्मशानभूमीच्या सर्वांगीण पुनर्विकास प्रकल्पाचे भूमिपूजन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते आज झाले. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि सीएसएन फर्स्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत असून, पुढील एका वर्षात आधुनिक आणि पर्यावरणपूरक 'वैकुंठ धाम' उभारण्याचे उद्दिष्ट आहे.

यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, महापौर समीर राजूरकर, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्यासह लोकप्रतिनिधी, प्रशासनातील अधिकारी आणि सीएसएन फर्स्टचे पदाधिकारी उपस्थित होते.

मंत्री अतुल सावे म्हणाले, 'प्रशासन, सामाजिक संस्था आणि सीएसआरच्या सहकार्याने उभे राहणारे असे समाजोपयोगी प्रकल्प ही काळाची गरज आहे. नागरिकांना अधिक दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.'

महापौर समीर राजूरकर यांनी शहराच्या विकासात सामाजिक संस्था आणि नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे सांगत, सीएसएन फर्स्टचा पुढाकार इतर संस्थांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्रत्येक व्यक्तीला सन्मानपूर्वक अखेरचा निरोप मिळणे हा त्याचा मूलभूत अधिकार असल्याचे सांगत या प्रकल्पासाठी पहिली देणगी जाहीर केली. सीएसएन फर्स्टचे माजी अध्यक्ष ऋषी बागला यांनीही देणगी देऊन उपक्रमाला पाठबळ दिले.

कैलासनगर स्मशानभूमी ही शहरातील सर्वात जुन्या स्मशानभूमींपैकी एक असून तिचा आधुनिक, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक विकास करण्यासाठी महानगरपालिका व सीएसएन फर्स्ट यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. प्रकल्पाची उभारणी आणि देखभाल सीएसएन फर्स्टकडून करण्यात येणार असून, आवश्यक नागरी सुविधा महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.


प्रकल्पामध्ये १२ आधुनिक अग्नीसंस्कार केंद्रे, विद्युत शवदाहिनी, लँडस्केपिंग, शिवमूर्ती, पाण्याची टाकी, स्वच्छतागृहे, पार्किंग, अंतर्गत रस्ते, संरक्षक भिंत, हरित क्षेत्र आणि नागरिकांसाठी बैठकीची व्यवस्था अशा अत्याधुनिक सुविधा उभारण्यात येणार आहेत. परिसरात दाट वृक्षलागवड आणि हरित पट्टा विकसित करून पर्यावरणपूरक नियोजनालाही प्राधान्य दिले जाणार आहे.

प्रकल्पाचे वास्तुविशारद महेश साळुंके यांनी आधुनिक वास्तुरचना, पर्यावरणपूरक संकल्पना आणि पारंपरिक संस्कृतीचा सन्मान यांचा समन्वय



साधणारा प्रकल्प आराखडा सादर केला. हा पुनर्विकास प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर छत्रपती संभाजीनगर शहराला स्वच्छ, सुसज्ज, आधुनिक आणि सन्मानपूर्वक अंत्यसंस्कार सुविधा उपलब्ध करून देणारे आदर्श 'वैकुंठ धाम' साकार होणार आहे.

# वेरूळ लेणी परिसरात निसर्गाचे रौद्ररूप; 'सीता न्हाणी' धबधब्यावर पर्यटकांची मोठी गर्दी





खुलताबाद, दि. २७ (प्रतिनिधी) – संततधार पावसामुळे खुलताबाद तालुक्यातील जागतिक वारसा स्थळ असलेल्या वेरूळ लेणी परिसराने निसर्गाचे रौद्र आणि मनमोहक रूप धारण केले आहे. मुसळधार पावसामुळे लेणी परिसरातील सर्व लहान-मोठे झरे दुथडी भरून वाहत असून, प्रसिद्ध 'सीता न्हाणी' धबधबाही पूर्ण क्षमतेने कोसळत आहे. या नयनरम्य दृश्याचा आनंद घेण्यासाठी रविवारी शेकडो पर्यटकांनी वेरूळकडे धाव घेतली.

सतत कोसळणाऱ्या पावसामुळे हिरवाईने नटलेला लेणी परिसर अधिकच खुलून दिसत असून, डोंगरकड्यांवरून कोसळणारे असंख्य धबधबे पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहेत. पावसाच्या सरी अंगावर झेलत पर्यटकांनी वेरूळ लेणीची सफर केली. अनेकांनी धबधब्याजवळ आणि लेणी परिसरात छायाचित्रे व सेल्फी घेत या अविस्मरणीय क्षणांची आठवण आपल्या कॅमेऱ्यात टिपली.

विशेषतः 'सीता न्हाणी' धबधबा पावसाळ्यात आपल्या रौद्र रूपात पाहायला मिळत असल्याने पर्यटकांची येथे मोठी गर्दी होत आहे. धबधब्याचा प्रचंड वेग, दाट धुके आणि सभोवतालची हिरवाई यामुळे परिसराचे सौंदर्य अधिकच खुलून दिसत आहे. दरम्यान, प्रशासनाने पर्यटकांना धबधब्याजवळील घसरड्या भागात जाणे टाळण्याचे, सुरक्षित अंतर राखण्याचे आणि आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. पावसाळ्यात वेरूळ लेणी परिसरातील निसर्गसौंदर्य अनुभवण्यासाठी राज्यासह परराज्यातील पर्यटक मोठ्या संख्येने येथे भेट देत असून, यामुळे परिसरात पर्यटनाला चांगली चालना मिळत आहे.

# आ.प्रा.रमेश पा.बोरनारे यांच्या वाढदिवस निमित्त गोर, गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, वृक्षारोपण व बाळंतीण झालेल्या महिलांना फळ वाटप



वैजापूर, दि. २७ (प्रतिनिधी) – माझ्या वाढदिवसाला कोणीही हार, तुरे, बुके, भेट वस्तु, शाल श्रीफळ आणू नये तर गोर गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करावे, वृक्षारोपण करावे, सरकारी रुग्णालयात रुग्ण व बाळंतीण झालेल्या महिलाना फळ, फळावर वाटप करावे असे आवाहन करीत वैजापूर चे आमदार रमेश पा. बोरनारे दोन दिवसासाठी बाहेर गावी निघून गेले, जेणेकरून कोणीही हार, तुरे, शाल, बुके आणू नये.

त्यांच्या आवाहना नुसार सोमवार (ता. २७) रोजी येथील नगर परिषदेच्या श्री. समर्थ विद्यालयात शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र पा. साळुंके, शहर प्रमुख पारस घाटे, युवा सेनेचे श्रीकांत साळुंके, शकेश्वर मुळे, शयाम साळुंके, प्रदीप साळुंके व मित्र परिवाराने आणलेले शैक्षणिक साहित्य, खाऊचे पुडे माजी आ. भाऊसाहेब पा.चिकटगावकर, नगरसेवक संजय बोरनारे, (आमदार बोरनारे याचे भाऊ) नगरसेवक राहुल त्रिभुवन, सुनीता ताई साखरे, उल्हास साळुंके, पोपट भोसले, धोंडीराम ठाकूर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले तसेच संतोष वाघ, मुख्याध्यापक आर. डी. वसावे, माजी शिक्षणाधिकारी तथा समाजसेवक धोंडीराम सिह राजपूत,सचिन राजपूत, सोन्याबापू गावडे,सुधाकर साळुंके, यांनीही विद्यार्थ्यांना वह्या वाटल्या तसेच या सर्वांनी शाळेच्याआवारात आंबे, चिंच, वड, पिंपळ, इत्यादींचे रोपण ही आ. रमेश बोरनारे यांच्या वाढदिवसानिमित्त केले व ही रोपटी वाढविण्यासाठी संकल्प ही केला. या शाळेतील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आसन पट्ट्यासाठी शंकेश्वर मुळे, अशोक साळुंके, वल्लभ सोनवणे, श्याम साळुंके यांनी पाच हजार एक रुपये दिले त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या शाळेतील विद्यार्थी कोळपकर व साळुंके शासनाच्या शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झाले त्यांचा गौरव करण्यात आला. यानंतर उप जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिक्षक डॉ.अरविंद हरबडे, व मुख्य मेट्रॉन माया महाडिकर यांच्या उपस्थितीत बाळंतीण नऊ महिलांना सफरचंद, बिस्कीट पुडे व केळी वरील मान्यवरांनी प्रदान केली.या प्रसंगी –माजी आ,चिकटगावकर,संजय बोरनारे, राजेंद्र पा, साळुंके, पारस घाटे,निलेश चाफेकर,डॉ. परेश भोपळे, कमलेश आंबेकर, अमोल बोरनारे, शशिकांत शिंदे, यांच्या सह आ. परिवार मित्र मंडळ यांनी ही महिलांना फळे वाटप केली. या समयी सेवा निवृत्त फौजदार सोपान निकम, महेश बुनगे, प्रदीप साळुंके, भागीनाथ निकम,अशोक अण्णा चव्हाण, दीपक साळुंके याची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन धोंडीरामसिंह ठाकूर यांनी केली तर आभार राजेंद्र पा. साळुंके यांनी मानले.

# डॉ. सिद्दीकी अफरोजा खातून यांना लोकनेते अजित पवार सन्मान पुरस्कार प्रदान



खुलताबाद, दि. २७ (प्रतिनिधी) – उर्दू एज्युकेशन सोसायटीच्या अंतर्गत कार्यरत चिश्तिया महाविद्यालय, खुलताबाद येथील उर्दू विभागप्रमुख डॉ. सिद्दीकी अफरोजा खातून मोहम्मद मजीबुल हुसैन यांना त्यांच्या शैक्षणिक, संशोधनात्मक तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी म्हणून केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने 'लोकनेते अजित दादा पवार सन्मान पुरस्कार' प्रदान करण्यात आला. महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे आयोजित जनसेवा सप्ताह ( २२ ते २८ जुलै २०२६ ) या उपक्रमांतर्गत हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित भव्य आणि समारंभात दैनिक लोकमत पुणेचे संपादक संजय आवटे यांच्या हस्ते डॉ. सिद्दीकी अफरोजा खातून यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष तथा आमदार सतीश चव्हाण यांनी केले होते.

यावेळी जिल्ह्यातील अनेक राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या. हा सन्मान प्राप्त झाल्याबद्दल उर्दू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष शेख मोहम्मद अय्यूब, उपाध्यक्ष मोहम्मद शाकीर, सरचिटणीस अब्दुल वहीद, डॉ. अब्दुल मुकीत तसेच चिश्तिया महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सय्यद आसिफ झकेरिया यांनी आनंद व्यक्त करून डॉ. सिद्दीकी अफरोजा खातून यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

तसेच त्यांच्या शैक्षणिक, संशोधनात्मक आणि सामाजिक कार्याचे कौतुक केले. चिश्तिया महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, नातेवाईक, मित्रपरिवार आणि हितचिंतक यांनीही डॉ. सिद्दीकी अफरोजा खातून यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# आषाढी एकादशीनिमित्त मिल कॉर्नर येथे विठ्ठल नामस्मरण व महाप्रसादाचा भक्तिमय सोहळा उत्साहात संपन्न






छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) – आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त सु-लक्ष्मी ग्रुपच्या वतीने श्री विठ्ठल नामस्मरण व महाप्रसादाचे भक्तिमय आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन दीपकजी कर्नवाल अंकित पटेल यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी दिपक कर्नवाल, अंकित पटेल, डॉ. नंदलाल बोथरा, शुभम बोथरा, रोहित कोटेचा, प्रदीप पवार, संतोष गायकवाड, डि.बी.पाटील, मानकर, राजपुत, सचिन निकम, संतोष राजपुत, प्रेम लिंगायत, यश, सौ.लता, सौ. पुजा आदी उपस्थित होते.

या प्रसंगी मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून श्री विठ्ठलाच्या नामस्मरणात सहभागी होत आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घेतला. त्यानंतर आयोजित महाप्रसादाचा हजारो भक्तांनी लाभ घेतला. संपूर्ण परिसर 'जय हरी विठ्ठल', 'ज्ञानोबा-तुकाराम' अशा गजरांनी दुमदुमून गेला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सु-लक्ष्मी ग्रुपच्या सर्व पदाधिकारी, कर्मचारी व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. उपस्थित भाविकांनी आयोजकांचे कौतुक केले. अशा धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# जेष्ठ नागरिकांनी आहार बाबत अति दक्षता पाळावी-जेष्ठ नागरिक से.नि. प्रा.पी.जी. श्रीवास्तव





वैजापूर दि.२७ (प्रतिनिधी)- जेष्ठ नागरिकांनी आपल्या आहार बाबत व पिण्याचे पाणी पाण्याबाबत दक्ष रहावे,उतरत्या वयात शरीरातील प्रथिने व जीवनसत्वे कमी होत जातात व त्यामुळे व्यक्ती ऊर्जा रहित जगत असतो ,अशा समयी फळ,फळावर, व मोड आलेले कडधान्य ,व शाकाहारी अन्न ग्रहण करून आपली ऊर्जा टिकवून ठेवावी असे आवाहन सेवा निवृत्त जेष्ठतम नागरिक प्रा, पी. जी.श्रीवास्तव यांनी चैतन्य जेष्ठ नागरिक सेवा संघाच्या जेष्ठ नगरीत बैठकीत केले.

अध्यक्षस्थानी साहेबराव साळुंके होते. सोमवार(ता.२७)रोजी जेष्ठ नागरिक बैठक श्री साईबाबा मंदिरात पार पडली. जेष्ठ नागरिक अशोकराव धसे, श्री.कोलते यांनी येणाऱ्या गुरू पौर्णिमेवर भाषण केले.

जेष्ठतम नागरिक धोंडीरामसिंह राजपूत यांनीही जेष्ठतम नागरिकांना संबोधित करताना जेष्ठतम नागरिकांनी आपल्या जीवनात संयम,सामंजस्य, व शांतता बाळगावी, जेष्ठ नागरिकानी या उतरत्या वयात मन सदैव जागृत ठेवावे,

'व्यस्त रहा मस्त रहा', असा संदेश त्यांनी उपस्थित जेष्ठांना दिला,या प्रसंगी जेष्ठ नागरिक झुंबरलाल शर्मा,अण्णा साहेब शेळके ,कृष्णा कांबळे,एस. डी. त्रिभूवन,बबनराव क्षीरसागर, सुरेश संत,पुंडलिक चव्हाण,श्री.श्रीवास्तव,श्री. पाटील,सुभाष चाफेकर, सुभाष आंबेकर,श्री कडू, रामदास व्यवहार ईत्यादी जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

# बागबान समाजातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार; शिक्षणातून समाजाच्या प्रगतीचा निर्धार





छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) – बागबान एज्युकेशनल ट्रस्ट, महाराष्ट्र आणि बागबान पंच मुशाविराती कमिटी, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने 'भव्य सत्कार व करिअर मार्गदर्शन सत्र' २६ जुलै रविवार रोजी उत्साहात संपन्न झाले. समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना उच्च शिक्षणासाठी प्रेरित करण्याबरोबरच करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अब्दुल जब्बार हाजी मुहम्मद गौस बागबान (अध्यक्ष, बागबान एज्युकेशनल ट्रस्ट, महाराष्ट्र) होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून अशरीन अश्फाक बागबान (सहायक आयुक्त, बिहार सरकार) यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात शिक्षणाचे महत्त्व, प्रशासकीय सेवांमधील संधी आणि यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या गुणांविषयी मार्गदर्शन केले. तर शेख जमील अहमद (करिअर समुपदेशक, शिक्षण विभाग व शिक्षक, इकरा उर्दू बॉईज हायस्कूल, औरंगाबाद) यांनी विद्यार्थ्यांना करिअर नियोजन, स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास आणि उच्च शिक्षणाच्या विविध पर्यायांची सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाला मुहम्मद उस्मान सेठ (नांदेड), शफी भाई चांद भाई बागबान (सांगली), अकील चौधरी (उदगीर), नसीर अहमद खलिफा (सोलापूर), मुनाफ चौधरी (सोलापूर), शकील अहमद अली अहमद (भिवंडी), मोहम्मद अश्फाक बागबान (जळगाव), सय्यद सलीम सेठ (परभणी) आणि शेख युनूस बागबान (शाहादा) यांच्यासह विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी व समाजबांधवांची उपस्थिती लाभली. या प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनीही मार्गदर्शनाचा लाभ घेत उच्च ध्येय निश्चित करून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाला पालक, विद्यार्थी, समाजातील ज्येष्ठ नागरिक व विविध भागांतून आलेले पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजात शैक्षणिक जागरूकता वाढविणे, गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करणे आणि नव्या पिढीला योग्य दिशा देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

उपस्थित मान्यवरांमध्ये मुजाहेद सेठ, नईम चौधरी, मोसीन चौधरी, जब्बार सेठ (जेपी), शेख मजार मुनीर, मेराज बशीर सेठ, जफर अब्दुल रहमान, गफ्फार चौधरी, इब्राहिमभाई फुलवाले, हसन चौधरी, मौलाना सादिक, युसूफ चौधरी, मुसा चौधरी, भैय्या सेठ, तय्यबभाई पालखेड, खलीलभाई मिरची, हुसेन मंकजी, बाकीभाई, मन्सूरभाई बँकवाले, इसाकभाई (दिल्ली गेट), कादिर मदनी, ओमरभाई लासूर, अब्दुल करीम भैय्या, रज्जाक चौधरी, अय्युब बिस्मिल्लाह, माजेद मीरा सायकल, नूर मोहम्मद, युसूफ शेख हुसेन, मौलाना मुस्ताक लाडसावंगी, जावेदभाई खाजा मियाँ, गफ्फार अज्जूभाई, शेख मुश्ताक, शेख शकील अहमद, वकील बागवान मुदस्सिर शेख, अकबर मौलाना लाडसावंगी, हाजी नसीम साब (बैजीपुरा), मुनाफ चौधरी, अल्ताफभाई बिडकीन, सत्तार हाजी, सिराजभाई (बीएफ), अब्दुल कादर कालूभाई, अब्दुल कदीर, शेख मुसा शेख इस्माईल आणि हाजी अयाज मोहम्मद साहब यांचा समावेश होता.

## शिक्षणाच्या माध्यमातूनच समाजाची सर्वांगीण प्रगती



**"समाजाच्या पारंपरिक व्यवसाय हा फळ विक्रीचा जरी असला तरी त्यासोबतच शिक्षणालाही सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. प्रत्येक पालकाने आपल्या मुलांना उच्च शिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील राहावे. शिक्षणाच्या माध्यमातूनच समाजाची सर्वांगीण प्रगती शक्य असून विद्यार्थी मेहनत, शिस्त आणि चिकाटीच्या बळावर प्रशासकीय, तांत्रिक, वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि इतर विविध क्षेत्रांत यश संपादन करून आपल्या आई-वडिलांसह संपूर्ण समाजाचे नाव उज्ज्वल करू शकतात.**

**– अशरीन अश्फाक बागबान**
(सहायक आयुक्त, बिहार सरकार)

# गुरुपौर्णिमेनिमित्त मिटमिटा येथे धार्मिक, सामाजिक उपक्रमांची मेजवानी; भूमिपूजन, रक्तदान व गुणवंतांचा सत्कार




छत्रपती संभाजीनगर, दि. २७ (प्रतिनिधी) – भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करणारा गुरुपौर्णिमा महोत्सव यंदा २९ जुलै रोजी मिटमिटा येथील श्री स्वामी मच्छिंद्रनाथ मंदिर व श्री सप्तशृंगी माता मंदिर परिसरात विविध धार्मिक, सामाजिक आणि सेवाभावी उपक्रमांनी उत्साहात साजरा होणार आहे. या निमित्ताने श्री प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने दोन दिवसांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

गुरुपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला २८ जुलै (मंगळवार) रोजी मिटमिटा येथील मनपा शाळेत दहावीत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुरूमाता स्व. सौ. माधवी माधवराव रत्नपारखी (माँ) यांच्या स्मरणार्थ सत्कार करण्यात येणार आहे. याचवेळी शाळेला आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप वेदांत रत्नपारखी यांच्या वतीने करण्यात येणार आहे.

सायंकाळी ५ ते ७ या वेळेत अमरावती येथील श्री नरेंद्र केवले यांचे 'सद्गुरू डॉ. श्री मंगलनाथ महाराज यांचे अलौकिक आध्यात्मिक जीवन व लोकोत्तर कार्य' या विषयावर कीर्तन होणार आहे.

२९ जुलै (बुधवार) गुरुपौर्णिमेच्या दिवशी पहाटेपासून विविध धार्मिक विधींना प्रारंभ होणार असून परात्पर सद्गुरू श्री स्वामी मच्छिंद्रनाथ महाराजांचे पूजन, गुरुपौर्णिमा हवन, मानसपूजा, नामजप, विभूती अभिषेक, मंगलगाथा पोथीचे चक्रीपारायण, सद्गुरूपूजन, समाधीपूजन, नारायण स्तोत्र, महाआरती, भंडारा आणि महाप्रसाद असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. गुरुपौर्णिमा हवन वेदांत रत्नपारखी यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

याच दिवशी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात येणार आहे. तसेच सद्गुरू डॉ. श्री मंगलनाथ महाराज यांच्या प्रस्तावित मंदिराचे भूमिपूजन हा सोहळाही गुरुपौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर पार पडणार आहे.

या सर्व धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचा लाभ भाविक, भक्त, शिष्य आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन श्री प्रतिष्ठान ट्रस्टचे मॅनेजिंग ट्रस्टी वेदांत रत्नपारखी यांनी केले.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# वेरूळ-घृष्णेश्वर मंदिर परिसराची स्वच्छता राखणे ही सर्वांची जबाबदारी-विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

## वेरूळमध्ये जागतिक दर्जाची स्वच्छता राखण्यासाठी सामूहिक प्रतिज्ञा



छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- वेरूळ-घृष्णेश्वर येथे जगभरातून मोठ्या संख्येने पर्यटक आणि भाविक भेट देत असतात. पुढील वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवरही या परिसरात मोठ्या संख्येने भाविक व पर्यटक येण्याची शक्यता आहे. त्यांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच परिसरात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे संबंधित सर्व यंत्रणांनी समन्वयाने योग्य व्यवस्थापन करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले.

स्वच्छता राखणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी असून, वेरूळ येथे यापुढे जागतिक दर्जाची स्वच्छता राखण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे आवाहन करत विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी उपस्थितांना स्वच्छतेची सामूहिक प्रतिज्ञा दिली.

वेरूळ-घृष्णेश्वर मंदिर परिसरातील विकास आराखडा व स्वच्छतेबाबत विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम., अपर आयुक्त (विकास) सुषमा देसाई यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, पुरातत्त्व विभाग, घृष्णेश्वर मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी, छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, ग्रामपंचायत तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी विविध सूचना व मते मांडली.

जी. श्रीकांत म्हणाले की, वेरूळ-घृष्णेश्वर मंदिर परिसरात पर्यटक व भाविकांची कायम वर्दळ असते. त्यामुळे येथे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याबरोबरच घनकचरा व्यवस्थापन नियम, २०२६ ची प्रभावी अंमलबजावणी करावी. घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने या परिसरात घनकचरा प्रक्रिया केंद्र उभारण्यासाठी तातडीने सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करावा, असे निर्देशही त्यांनी संबंधित यंत्रणांना दिले. पर्यटक, भाविक व व्यावसायिकांकडून तसेच गर्दीच्या काळात मोठ्या प्रमाणावर निर्माण होणारा कचरा वेळोवेळी गोळा करण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळाचा वापर करावा. त्याचबरोबर परिसर सुशोभीकरण, जनजागृती आणि दंडात्मक उपाययोजना राबवाव्यात, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. कचऱ्याचे ओला व सुका असे वर्गीकरण होणे आवश्यक असून, कचऱ्यापासून पुनर्वापराच्या वस्तूंच्या निर्मितीला प्रोत्साहन द्यावे. यासाठी महिला बचत गटांचा सहभाग वाढवावा, असेही विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी सांगितले.

# सामाजिक उत्तरदायित्व निधीतून टोयोटा-किर्लोस्कर करणार पाणलोट विकास

**१६ कोटी निधीतून ६१६७ हेक्टरवर जलसंधारण, ११ हजारांहून अधिक ग्रामस्थांना होणार फायदा**





छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील पैठण आणि छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील ९ गावांमध्ये 'वसुंधरा' या सर्वसमावेशक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. टोयोटा-किर्लोस्कर मोटर्सचा सामाजिक उत्तरदायित्व निधी, राज्य शासन आणि समुह सहभाग अशा योगदानातून हा उपक्रम राबविला जाणार असून या संदर्भात बुधवारी (दि.२२) सामंजस्य करार करण्यात आला, अशी माहिती वॉटरशेट ऑर्गनायझेशन ट्रस्टचे विभागीय व्यवस्थापक श्याम पडुळकर यांनी दिली.

ऑगस्ट २०२६ ते जुलै २०२९ या तीन वर्षांच्या कालावधीत हा प्रकल्प राबवला जाणार असून, यासाठी एकूण १६ कोटी ०५ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

गोदावरी नदीच्या पाणलोट क्षेत्रात आणि जिल्हा मुख्यालयापासून सुमारे ३० ते ४० किमी अंतरावर असणाऱ्या या ९ गावांमध्ये दरवर्षी एप्रिल ते जून दरम्यान तीव्र पाणीटंचाई जाणवते. या प्रकल्पाच्या माध्यमातून परिसरातील पाणीटंचाई दूर करून कृषी क्षेत्राला संजीवनी देण्याचा प्रयत्न केला जाईल. हा प्रकल्प वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट या संस्थेमार्फत राबविण्यात येणार असून टोयो टा किर्लोस्कर मोटर्स हे सामाजिक उत्तरदायित्व निधीचा विनियोग करणार आहे.

यासंदर्भात बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात सामंजस्य करार झाला. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम., उपवनसंरक्षक सुरेखा माने, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, जिल्हा जल संधारण अधिकारी नरेंद्र कटके, टोयोटा किर्लोस्करचे कार्यकारी उपाध्यक्ष विक्रम गुलाटी, उपाध्यक्ष (सामाजिक उत्तरदायित्व निधी) ए. रमेश राव, वॉटरशेड ऑर्गनायझेशनचे कार्यकारी अधिकारी प्रकाश केसकर, विभागीय व्यवस्थापक श्याम पडुळकर आदी उपस्थित होते.

**प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये आणि आराखडा:**

क्षेत्रफळ व विस्तार: ६,१६७ हेक्टर क्षेत्रावर पाणलोट विकास उपचार केले जातील, ज्याद्वारे २०३ क्षेत्राला सिंचनाच्या कक्षेत आणण्याचे नियोजन आहे.

लाभार्थी: २,३९८ कुटुंबांतील सुमारे ११,२६८ ग्रामस्थांना या प्रकल्पाचा थेट फायदा होईल.

कालावधी: ऑगस्ट २०२६ ते जुलै २०२९ (३ वर्षे).

निधीचा तपशील (एकूण १६.०५ कोटी):

१.टोयोटा किर्लोस्कर मोटर : ९.३३ कोटी

२.महाराष्ट्र शासन (विविध शासकीय योजनांद्वारे): ५.४० कोटी

३.स्थानिक समुदाय/लोकसहभाग: १.३३ कोटी

**अंमलबजावणी व सहभाग:**

हा प्रकल्प वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट या संस्थेमार्फत राबविला जाणार असून, टोयोटा किर्लोस्कर मोटर (ऊख्श) चे आर्थिक व तांत्रिक सहाय्य लाभणार आहे. तसेच, महाराष्ट्र शासन आपल्या विविध शासकीय योजनांचा (ण्दहनुीहम) ताळमेळ घालून प्रकल्पाला पूर्ण सहकार्य करणार आहे.

**मुख्य उद्दिष्टे आणि अपेक्षित परिणाम:**

पिण्याच्या पाण्याची उपलब्धता: गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची उपलब्धता ९ महिन्यांवरून १२ महिने (वर्षभर) करणे.

हवामान-अनुकूल शेती: जमिनीतील ओलावा वाढवून कृषी उत्पादकता वाढवणे आणि हवामान बदलास सक्षम असणाऱ्या शेती पद्धतींचा वापर करणे.

रोजगार व उपजीविका: अल्पभूधारक, शेतमजूर आणि भूमिहीन कुटुंबांसाठी उपजीविकेच्या नवीन संधी निर्माण करणे.

समुदाय सक्षमीकरण: लोकसहभागातून नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन करणे आणि स्थानिक ग्राम संस्थांना प्रशिक्षण देऊन सक्षम करणे.

या प्रकल्पामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त ९ गावांचे रूपडे बदलणार असून, पाणी आणि शेतीच्या बाबतीत हे क्षेत्र आत्मनिर्भर होण्यास मोठी मदत होणार आहे.

*पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६*

# जिल्ह्यातील १ लाख ५ हजार १२८ शेतकरी पात्र; ई.के.वाय.सी. फक्त १४ हजार जणांचे पूर्ण

## आधार प्रमाणीकरण तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन



छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' अंतर्गत जिल्ह्यातील १,२७६ गावांमधील एकूण १ लाख ५ हजार १२८ शेतकरी पात्र ठरले आहेत. दरम्यान पात्र शेतकऱ्यांपैकी आतापर्यंत केवळ १४ हजार ७६९ शेतकऱ्यांनीच ईकेवायसी पूर्ण केले आहे. तरी उर्वरीत शेतकऱ्यांनी तात्काळ ईकेवायसी पूर्ण करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

दरम्यान पात्र शेतकऱ्यांच्या नावांची यादी गावोगावी प्रसिद्ध होताच शेतकऱ्यांनी जाऊन आपले नाव असल्याची खात्री करण्यासाठी वि.का. सोसायटी, जिल्हा बँक, बँक, ग्रामपंचायत कार्यालय इ. ठिकाणी गर्दी केली होती.

या योजनेस मंजुरी मिळाल्यानंतर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १,२७६ गावांमधील १ लाख ९० हजार ७०१ शेतकऱ्यांची नावे अपलोड करण्यात आली आहेत. त्यापैकी आतापर्यंत १ लाख ५ हजार १२८ शेतकरी पात्र ठरले आहेत. (पात्र शेतकऱ्यांची संख्या वाढू शकते.) आता ह्या टप्प्यानंतर शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करताच त्यांच्या कर्जखात्यात कर्जमाफीचा लाभ जमा होईल. तथापि आतापर्यंत केवळ १४ हजार ७६९ शेतकऱ्यांनीच ईकेवायसी पूर्ण केले आहे. अद्याप ९० हजार ३५९ शेतकऱ्यांचे ईकेवआयसी बाकी आहे, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक समृत जाधव यांनी दिली आहे.

**ईकेवायसी विनामूल्य**

दरम्यान सहकार आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर योजनेसाठी पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांसाठी ईकेवायसी प्रक्रिया पूर्णतः विनामूल्य आहे. तरी आपले सरकार सेवा केंद्र, सीएससी केंद्र यांनी शेतकऱ्यांकडून ईकेवायसी करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारु नये,असे निर्देश सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी दिले आहेत. जिल्ह्यातील आपले सेवा केंद्र चालकांनी कर्जमुक्तीस पात्र शेतकऱ्यांकडून ईकेवायसीसाठी कोणतेही शुल्क आकारु नये असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिले आहेत. एकूण १ लाख ५ हजार १२८ पात्र शेतकऱ्यांची यादी शासनाच्या पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही यादी संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, CSC केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र, ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय तसेच सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. आता योजनेचा लाभ मिळविण्यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांनी जवळच्या 'आपले सरकार सेवा' किंवा **CSC** केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक व बंधनकारक आहे. त्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी आपले नाव लाभार्थी यादीत असल्याची खात्री करून अंगठ्याचे प्रमाणीकरण, मूळ आधार कार्ड आणि बचत खात्याचे पासबुक सोबत आणणे आवश्यक आहे. जिल्हा उपनिबंधक समृत जाधव यांनी शेतकऱ्यांना विलंब न करता आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्याचे आवाहन केले असून, अधिक माहितीसाठी संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था किंवा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाशी संपर्क साधण्यास सांगितले आहे. दरम्यान, राज्यातील 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना टप्प्याटप्प्याने कर्जमाफीचा लाभ देण्यात येत असून, आधार संलग्नीकरण आणि प्रमाणीकरण आणि अग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करणे ही लाभ मिळविण्याची महत्त्वाची अट असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. जिल्ह्यातही ही प्रक्रिया अजून सुरु असून लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ होईल, असेही श्री. जाधव यांनी स्पष्ट केले आहे.

# नशामुक्त छत्रपती संभाजीनगर:मानवी साखळीद्वारे जनजागृती

## नशामुक्त जीवनासाठी संकल्प करु या- जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी.

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग व सारा नवजीवन बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने शहागंज परिसरात आज सकाळी विद्यार्थ्यांनी मानवी साखळी तयार करुन त्याद्वारे नशामुक्तीबाबत जनजागृती केली. जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी विद्यार्थ्यांना नशामुक्त जिवनाचा संकल्प करण्याचे आवाहन केले.

जिल्हा परिषद, माध्यमिक, प्राथमिक शिक्षण विभाग,सारा नवजीवन बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. समाज कल्याण विभाग, जिल्हा आरोग्य विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग, पोलीस प्रशासन, महानगरपालिका तसेच विविध शासकीय विभाग ह्या उपक्रमात सहभागी झाले. तब्बल २ हजार शालेय विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.





'नशा छोडो, परिवार जोडो – नशा छोडो, भारत जोडो' या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला 'नशामुक्त छत्रपती संभाजीनगर' ही मानवी रांगोळी ५०० विद्यार्थ्यांनी साकारली. त्याचे ड्रोनद्वारे चित्रण करण्यात आले.

जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती पी. एम. मित्रू हस्ते रॅलीला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. शिक्षणाधिकारी श्रीमती अश्विनी लाठकर, उपशिक्षणाधिकारी श्रीमती दिपाली थावरे,निता श्रीश्रीमाळ,गिता तांदळे, विस्तार अधिकारी दिलीप सिरसाठ,जालम चौरे, सुनिता वाघ, ज्ञानेश्वर रोडगे उपस्थित होते. नशामुक्त भारत अभियानाचे मास्टर ट्रेनर डॉ. कृष्णा रामचंद्र भावले यांनी उपस्थित विद्यार्थी व नागरिकांना नशामुक्तीची शपथ दिली. राष्ट्रीय हिंदी महाविद्यालय, डॉ. झाकीर हुसेन कनिष्ठ महाविद्यालय,सर सय्यद महाविद्यालय,डॉ. झाकीर हुसेन हायस्कूल, रोशनगेट,मलिकंबर उर्दू हायस्कूल, रजा रोड, अनिसा उर्दू हायस्कूल, रविंद्रनगर,विनर्स इंग्लिश हायस्कूल, रविंद्रनगर,खैरुल मोमिनीन उर्दू हायस्कूल, राडपुरा,इकरा बॉईज हायस्कूल, एस. टी. कॉलनी, भारतीय विद्या मंदिर, रोशनगेट,अल्मीर उर्दू हायस्कूल, पी. यू. जैन माध्यमिक विद्यालय, अल्लमा शिब्ली उर्दू हायस्कूल इ. शाळांनी यात सहभाग घेतला. सूत्रसंचालन शेख रशीद रहीमान यांनी तर भाऊ पठाडे यांनी आभार मानले.

## जेहूर येथे आज पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विकास मार्गदर्शन केंद्र व साईराज स्किल डेव्हलपमेंट सेंटर जेहूर ता. कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा जेहूर ता. कन्नड येथे सकाळी साडेनऊ वा. होणार आहे. या मेळाव्यात सहभागी व्हावे असे आवाहन सहायक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांनी केले आहे.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**अल्पमुदत ई-निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता (स्था.), महावितरण, छ.संभाजीनगर तर्फे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दैनंदिन स्थापत्य देखभाल व दुरुस्ती कामांकरिता ई-निविदा क्र. T-13/2026-27/3rd Call, T-16/2026-27/3rd Call तसेच T-17/2026-27 ते T-25/2026-27 साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा सूचना व निविदा प्रपत्र महावितरणचे संकेतस्थळावर (http://etender.mahadiscom.in/eatApp) दि. २८.०७.२०२६ ते ०१.०८.२०२६, २३:५५ वाजे पर्यंत खरेदीस उपलब्ध आहे. तसेच सदर निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख दि. ०२.०८.२०२६ रोजी १८:०० वाजेपर्यंत असेल. सदर निविदा दि. ०३.०८.२०२६ रोजी ११:०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधीसमक्ष शक्य असल्यास उघडण्यात येतील. कोणतेही कारण न दाखविता सदर निविदा रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीकारणे राखून ठेवले आहेत.

टिप: जर विहित कालावधीत निविदा विक्रीस गेल्या नाही, तर सदरील निविदा विकण्याची कालावधी लगेच वाढविण्यात येईल व त्याकरिता कोणतेही शुद्धिपत्रक वा निवेदन प्रकाशित करण्यात येणार नाही. त्याकरिता नोंदणीकृत कंत्राटदारानी या संबंधीच्या सूचना महावितरण कंपनीच्या संकेतस्थळावर वेळोवेळी तपासणी करत राहावी.

**PRO No: PRO/CSN/107/2026-27** स्वा./-

**कार्यकारी अभियंता (स्था.), स्थापत्य विभाग, छ.संभाजीनगर**

**संपर्क क्र. ७८७५०३००४३**

# घाटी रुग्णालयात परिचारिकांचे निदर्शन; प्रलंबित मागण्यांसाठी 'काम बंद' आंदोलनाचा इशारा

छत्रपती संभाजीनगर दि.२७ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात शासकीय परिचारिका संघटनेने विविध प्रलंबित मागण्यांसाठी प्रशासनाविरोधात निदर्शने केली. सकाळी अर्धा तास चाललेल्या या आंदोलनात परिचारिकांनी 'काम बंद' आंदोलनाचा इशारा दिला आहे.

या निदर्शनांदरम्यान प्रशासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. परिचारिकांना वाहन पार्किंगसाठी येणाऱ्या अडचणी आणि महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा प्रलंबित भत्ता या प्रमुख मागण्या होत्या. प्रशासनाने या मागण्यांची दखल न घेतल्यास लवकरच एक दिवसाचे 'काम बंद' आंदोलन पुकारण्यात येईल, असे संघटनेने स्पष्ट केले.

परिचारिका संघटनेची मुख्य मागणी महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेचा प्रोत्साहनपर भत्ता त्वरित देण्याची आहे. यापूर्वीही याबाबत चर्चा झाली होती, परंतु अद्याप कोणताही तोडगा निघालेला नाही.

रुग्णालयात परिचारिकांची संख्या मोठी असल्याने त्यांच्यासाठी स्वतंत्र वाहन पार्किंगची व्यवस्था करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. सध्या महिला परिचारिकांना गाड्या इतरत्र लावाव्या लागत असल्याने त्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. तसेच, लिपिक विभागाकडे असलेली परिचारिकांची प्रलंबित कामे आणि त्यात होणारा विलंब थांबवण्यात यावा, अशी मागणीही संघटनेने केली.

(पान १ वरुन)

## बिहार बंद आंदोलनात...

एके-४७ चा वापर झाल्याचे वृत्त आहे आणि शेकडो विद्यार्थ्यांना अटक करून त्यांच्यावर एफआयआर दाखल केले जात आहेत.' मोदीजी, विद्यार्थ्यांविरुद्ध एफआयआर दाखल होणार नाहीत आणि त्यांची सुटका केली जाईल, हे तुमचे वचन कुठे आहे? उलट, त्यांच्यावर प्राणघातक हल्ले आणि क्रूरता केली जात आहे. दिल्लीत विद्यार्थ्यांवर पेलेट गनचा वापर झाला, तर बिहारमध्ये एके-४७ चा. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार किंवा दिल्ली असो, सर्वत्र पद्धत तीच आहे. मी हे आधीही सांगितले आहे, हे सरकार खोटारडे आहे. सुधारणा करणे त्यांच्या आवाक्याबाहेर आहे. ते आपल्या शब्दावरून फिरतील आणि प्रत्येक डावपेच वापरून विद्यार्थ्यांचा आवाज दाबतील. मोदीजी, देशातील विद्यार्थ्यांची माफी मागा. आणि विद्यार्थ्यांवर हल्ला करून त्यांना चिरडणाऱ्यांवर कारवाई करा, विद्यार्थ्यांवर नाही. भाजपने राहुल गांधींच्या आरोपांना 'अफवा' आणि दिशाभूल करणारे म्हटले आहे. आंदोलने भडकवण्याचा आणि अराजकतेचे वातावरण निर्माण करण्याचा आरोप करत, भाजपने माफीची मागणी केली आहे.

बिहारचे विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी विचारले, 'बिहारमध्ये कोणाच्या आदेशाने एके-४७ चालवण्यात आल्या?' तुम्ही व्हिडिओ पाहिल्यास, एके-४७ मधून हवेत गोळीबार झाला नाही, तर लक्ष्य साधून गोळीबार करण्यात आला. तीन विद्यार्थ्यांना गोळ्या लागल्या.' एके-४७ चालवणाऱ्या एका जवानाचा व्हिडिओ शेअर करत त्यांनी लिहिले, 'उद्या कोणताही पोलीस कोणत्याही नेत्यावर, मंत्र्यावर किंवा अगदी मुख्यमंत्र्यांवरही, कधीही, कुठेही, कोणत्याही कारणाशिवाय गोळीबार करू शकतो का?'

## राज्यातील अनेक भागात...

अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता असल्याने येथे ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुणे शहरात विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो. सातारा व कोल्हापूरमध्ये हलका ते मध्यम पाऊस होईल, तर सोलापूर आणि सांगली जिल्ह्यांत हलक्या पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज आहे.

कोकणात पावसाचा जोर कायम राहणार आहे. रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर पालघर जिल्ह्यात मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच मुंबई, ठाणे आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान, घाटमाथ्याच्या परिसरात प्रवास करणाऱ्या नागरिकांनी आणि शेतकरी बांधवांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

नाशिक जिल्ह्यातील धरणांच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे गोदावरी नदीची पुरस्थिती सलग पाचव्या दिवशीही कायम आहे. गोदाकाठावरील अनेक मंदिरे अद्याप पाण्याखाली असून दुतोंड्या मारुती मंदिरातील मूर्तीच्या छातीपर्यंत पाणी आहे. जिल्ह्यातील १४ धरणांतून आजही पाण्याचा विसर्ग सुरू आहे. गंगापूर धरणातून ४,९९७ क्युसेक, तर दारणा धरणातून १३,२५० क्युसेक पाणी सोडले जात आहे. नांदूरमध्यमेश्वर धरणातून जायकवाडीकडे ४३,०६८ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर) पैठण (छत्रपती संभाजीनगर)**
**Email ID: jidnnn@gmail.com**

**जाहीर दरपत्रक प्रसिद्धी सूचना क्र.०१ सन २०२६-२७ (प्रथम प्रसारण)**
**(Quotation Notice-Budgetary officer)**

कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर), पैठण, छत्रपती संभाजीनगर, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदाराकडून सोबतचे यादीप्रमाणे बंद पाकिटात दरपत्रके मागवित आहेत. दरपत्रके स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता. जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उ), पैठण यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

| कामाचे वर्णन | ठेकेदाराचा नोंदणी वर्ग | दरपत्रक सादर करावयाचा कालावधी | दरपत्रक सादर करण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| Preparation of Emergency Action Plan (EAP) for Jayakwadi Dam as per Dam Safety Act 2021 and DRIP Guideline | निविदेतील अटी व शर्तींची पूर्तता करणारे सक्षम कंत्राटदार | दिनांक २८/०७/२०२६ रोजी सकाळी ९:४५ ते ०४/०८/२०२६ सायंकाळी १८:१५ वा. पर्यंत या कार्यालयीन वेळेत सादर करावे | कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उ), पैठण, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयात नमूद दिनांक व वेळेनुसार |

| Sr No | Description of Item | Unit |
|---|---|---|
| 1 | Determine and identify those situations or triggering events that would initiate an emergency action and specify the actions to be taken and by whom. Identify all jurisdictions, agencies and individuals who will be involved in the EAP. Discuss the development of the EAP with these parties. Field visits for data collection, ground truthing of surveyed and satellite data along with critical locations regarding EAP are also to be included. This interaction should include discussion on the need for and operation of an emergency operations centre and reception centre, as well as a discussion of evacuation (destinations, priorities and procedures), post-flood actions (recovery and cleanup), and other measures in the event of an emergency. Identify primary and auxiliary communication systems, both internal (between persons at the dam site) and external (between dam personnel and outside entities) with presentation in easy charts for all communication. List and prioritize all persons and entities involved in the notification process and draft the Notification Flowchart. Develop a draft of the EAP as per the guidelines provided in CWC (2016) report and as per provisions to the extent modified and super-ceded in the Guidelines for Developing Emergency Action plans for Dams (Feb 2016) Doc.No.CDSO-GUD-DS-01-v2.0). | Job |

वरील कामाची जाहीर दरपत्रक प्रसिद्धी सूचना कार्यालयाचे नोटीस बोर्डवर लावण्यात आलेली आहे. (सदर जाहीर दरपत्रक प्रसिद्धी सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास कार्यालयाचे नोटीस बोर्डवर लावण्यात येईल.)

**अटी व शर्ती :**

१. सदर दरपत्रक हे केवळ अंदाजपत्रक तयार करणेच्या हेतूने मागवीत आहोत.
२. निविदा अथवा कामाच्या अनुषंगाने सदर दरपत्रक कोणत्याही प्रकारे आश्वस्त करीत नाही.
३. एक किंवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा हक्क निम्नास्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.
४. दरपत्रकात सादर केलेले सर्व दरांचे दर विश्लेषण दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे. दरपत्रकासोबत दर पृथःकरण जोडलेले नसल्यास दरपत्रक नाकारण्यात येईल.

डीजीआयपीआर/२०२६-२०२७/१९३९

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता,**
**जायकवाडी पाटबंधारे विभाग,**
**नाथनगर (उ), पैठण**